# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २७७ - २२ दिनांक १५/०९/२०२२

## Fraud लोन ॲपच्या नावाने फसवणूक करणा-या आरोपीतांस अटक
## सायबर गुन्हे शाखेची कामगिरी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नायगाव (पुर्व) येथे राहणा-या महिला फिर्यादी यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये ऑनलाईन Cash Bro नावाने लोन ॲप डाऊनलोड केले होते. त्यांचे बँक खात्यात १३६५/- रुपये हे त्यांनी कोणतेही लोन घेण्याची प्रक्रिया न करता जमा करण्यात आल्याने फिर्यादी यांनी ॲपधारक यांना सदर प्रकार कळवून पैसे परत करीत असल्याबाबत सांगितले. परंतू सदर ॲपधारक याने “त्याबदल्यात अधिक पैसे भरावे लागतील नाहीतर तुमचे फोटो एडीट करुन ते तुमच्या संपर्कातील व्यक्तीला पाठवू अशी धमकी देवून शिवीगाळी केलेबाबतचा” तक्रारी अर्ज चौकशीकामी सायबर गुन्हे कक्ष येथे प्राप्त झाला होता.

सदर तक्रारी अर्जाची चौकशी करुन सायबर गुन्हे शाखा यांनी संशयित आरोपीतांस निष्पन्न केले. त्यावरुन महिला फिर्यादी यांनी दिनांक १३/०९/२०२२ रोजी वालीव पोलीस ठाणेस दिलेल्या फिर्यादीवरुन गु.रजि.नं. ९२३/२०२२, भा.दं.वि.स.कलम ३५४, ३८४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६, ६७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. नमूद गुन्हयात एस बँकेचे महातेश्वरी ट्रेडींग खात्याचे खाते धारक नामे १) नर्मेश संजय सुखादिया, वय २५ वर्षे, रा. ओसवाल शॉपींग सेंटर, भाईंदर (पुर्व), २) अरुण शांताराम कापकर, वय २७ वर्षे, रा. बुध्द विहार अचोळे गाव, नालासोपारा (पुर्व), ३) राजेश रामसिंग विश्वकर्मा वय २७ वर्षे, रा. प्लास्टीक गल्ली, भाईंदर रेल्वे स्टेशनसमोर, भाईंदर (पुर्व) यांचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना ताब्यात घेवून पुढील कारवाईसाठी वालीव पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास वालीव पोलीस ठाणे करीत आहे.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **ऑनलाईन लोन ॲप डाऊनलोड करण्यापुर्वी त्याचे सत्यतेची पडताळणी करावी.**
- **अशा प्रकारे लोन ॲप डाऊनलोड केल्यास कोणतीही परमिशन Allow करु नये. (गॅलरी,कॉन्टॅक्ट इ.)**
- **इन्स्टंट लोन ॲप पर्यायऐवजी बँकेशी संपर्क साधावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूकीचा प्रकार आपल्या सोबत घडलेला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुजितकुमार गुंजकर, पो.उप.निरी. प्रसाद शेनोळकर, म.पो.अं. माधूरी धिंडे , सुवर्णा माळी, म.सु.ब. सुरज मधे यांनी केलेली आहे.

----------------oooo------------------